**नियमित दिवाणी दावा क्र.६८९/२०१५** **निशाणी ४३ लगत**

**वादीचा साक्षीदार क्र.१ चा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे ॲड. श्री. बी.एफ. दिवे यांचे मार्फत :-**

२. मला उषा विजय सगळगिळे व सुरेखा बाळासाहेब रोहब अशा दोन बहिणी आहेत. मला संजय, विजय व राजु असे तीन भाउ आहेत. माझी बहिण सुरेखा ही संगमनेर येथे दिलेली आहे. माझी बहिण उषा हिला श्रीरामपुर येथे दिलेले आहे. विजय जयवंता सगळगिळे यांना राजु व संजय असे दोन भाउ आहेत. विजय जयवंत सगळगिळे यांना दोन बहिणी होत्या. त्यांची नावे मला माहित नाही. विजय सगळगिळे यांच्या दोन्ही बहिणी विवाहीत आहे. दावा दाखल केला त्यावेळी मी अज्ञान वादीच्या वडीलांच्या नावावर असलेले जमिनीचे कागदपत्रे पाहिली होती.

३. जयवंत सगळगिळे कधी मयत झाले होते, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, विजय सगळगिळे यांच्या सोबत माइया बहिणीचे लग्न विजय सगळगिळे यांच्या भाउ व बहिणीची माहिती घेवुन जुळविले होते. हे म्हणणे खरे नाही की, विजय जयवंत सगळगिळे हा अविवाहीत होता. मला आता **निशाणी क्र.५२** वरील फेरफार दाखविण्यात आला. त्या फेरफाराबाबत मला कधी माहिती मिळाली होती, हे मला सांगता येणार नाही. विजय जयवंत सगळगिळे यांना दोन बहिणी असल्याबाबत मला राजु सगळगिळे यांनी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ याच्यासोबत माझे संबंध दावा दाखल करण्याच्या अगोदरपासुन होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करण्याअगोदर विजय सगळगिळे यांच्या बहिणींबद्दल प्रतिवादी क्र.३ याने माहिती दिली नव्हती. विजय सगळगिळे हा डिग्रस येथे मयत झाला होता. विजय सगळगिळे कोणत्या तारखेला मयत झाला, हे मला सांगता येणार नाही. विजय सगळगिळे यांच्या बहिणींची दावा मिळकतींवर वारसाची नोंद झालेबाबत मी महसुल विभागाकडे तक्रार केली नव्हती.

**प्रतिवादी क्र.१ च्या विधींज्ञाच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास तहकुब**

श्रवणोत्तर स्विकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MAYURSINGH DILIPSINGH GAUTAM
Date: 2024.03.28 16:43:34 +0530

दिनांक: २८/०३/२०२४
राहुरी

(**मयुरसिंह दि.गौतम**)
दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
राहुरी.